महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education

नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001

e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


परीक्षा प्राध्यान्य / महत्वाचे

पत्र क्रं. नाविमं / उमागो / प्रात्य / 483
नागपूर दिनांक: 29 / 01 / 2025
03/02/2025

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
भंडारा / चंद्रपूर / नागपूर / वर्धा / गडचिरोली / गोंदिया.

विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च 2025 चे प्रात्यक्षिक परीक्षेबाबत,
संदर्भ : NDB/Prac/Conf/HSC/PRACT/137 Date 11/01/2025

उपरोक्त विषयाला अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उ. मा. प्र, परीक्षा फेंब्रु / मार्च –2025 चे प्रात्यक्षिक / तोंडी / श्रेणी विषयाचे साहित्य दि. 20 / 01 / 2025 रोजी जिल्हा संकलन केंद्रावरुन वाटप करण्यात आलेले आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा 24 / 01 / 2025 ते 10 / 02 / 2025 पर्यत नियोजित करावयाची आहे. प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन करीत असतांना खालील सुचनांचे पालन करावे

1) मंडळ कार्यालयात येऊन, दुरध्वनीव्दारे व पोस्टाने पत्र पाठवून बहिर्गत परीक्षक बदलून देण्याची विनंती करतात. मंडळ कार्यालयाने बहिर्गत परीक्षक नियुक्ती केलेली असल्याने त्यामध्ये कुठलाही बदल होणार नाही याची नोंद घ्यावी. ज्या विषयाचे नियुक्त बहिर्गत परीक्षक काही कारणास्तव कनिष्ठ महाविद्यालय सोडून गेले असतील तर त्याच्या ऐवजी ज्या शिक्षकांची नियुक्ती केली आहे त्यांना सदर कनिष्ठ महाविद्यालयास आवश्यक दुरुस्तीसह बहिर्गत परीक्षक म्हणून पाठविण्यात यावे. त्याची प्रमाणित छायाप्रत योग्य दुरुस्ती करीता मंडळाकडे सादर करावी

2) कनिष्ठ महाविद्यालय व नियुक्त बहिर्गत परीक्षक यानी बहिर्गत परीक्षण करीता येऊ शकणार नाही अथवा पाठवू शकणार नाही असे सांगितल्यास कनिष्ठ महाविद्यालय / नियुक्त बहिर्गत परीक्षक यांचे कडून स्पष्टीकरण प्राचार्य यांच्या शिक्का व सही ने मंडळ कार्यालयास सादर करण्यास सांगावे.

3) प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाने नियुक्त बहिर्गत परीक्षक यांचेशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन करावे. नियुक्त बहिर्गत परीक्षक यांचेशी संपर्क न साधता प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन केले आहे असे निदर्शनास आल्यास सदर कनिष्ठ महाविद्यालयावर मंडळ नियमावलीनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(चितांमण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ. नागपूर